**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - १७/०८/२०२३

**दि.१६/०८/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ८५५/२०२३ भा.दं.वि कलम ४५२,३२४, ३२३,३४,आर्म ॲक्ट ४,२५, महा.पो.अधि. कलम ३७ (१)(३)सह१३५,क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ३, ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०८/२०२३ रोजी १७.०० वा. सुमारास इंदिरानगर झोपडपटटी, डबल ट्री हॉटेलच्या पाठीमागे, चिंचवड, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/०८/२०२३ रोजी ०१.१७ वा |
| फिर्यादी | :- | तुकाराम चंदु पवार, वय- २५ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, रा. इंदिरानगर,झोपडपट्टी, हॉटेल डबल ट्री च्या पाठीमागे, चिंचवड, पुणे. |
| आरोपी | :- | १) रोहित चांदणे, वय- २५ वर्षे अंदाजे<br>२) शुभम चांदणे, वय- २२ वर्षे अंदाजे, दोघेही रा. इंदिरानगर झोपडपटटी, डबल ट्री हॉटेलच्या पाठीमागे, चिंचवड, पुण<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी किराणा सामान खरेदी करण्यासाठी जात असताना दोन्ही आरोपींनी जुन्या भांडणाचा राग मनात धरुन संगणमताने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी घरी जात असताना आरोपी क्र- १ याने चाकु घेवुन व आरोपी क्र- २ कोयता घेवुन परिसरात दहशत माजवुन फिर्यादीच्या घरामध्ये घुसुन त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला तसेच फिर्यादी यांच्या पत्नीवर आरोपी क्र- १ याने चाकुने वार केल्याने डाव्या हाताला दुखापत झाली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि शेटे ७२४९३४७३४७ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण६७८/२०२३ भा.दं.वि कलम ३७९,५११ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०८/२०२३ रोजी २२/०० वा. सुमा.फिर्यादीचे राहते घरा समोर रामभाऊ केळकर यांचेखोलीत,केळकर नगर, जंबुकर वस्ती, चाकण ता.खेड जि .पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/०८/२०२३ रोजी ०२.४७ वा |
| फिर्यादी | :- | नवानाथ रामनाथ येडे वय ३६ वर्षे व्यवसाय नोकरी रा.रामभाऊ केळकर यांचे खोलीत,केळकरनगर, जंबुकर वस्ती, चाकण ता.खेड जि.पुणे मुळ गाव मु.पो.विहीर, ता. अकोले जि.अहमदनगर |
| आरोपी | :- | १) मेहबुब मकबुल नदाफ वय २२ वर्षे रा.बाजीरावजाधव यांचे खोलीत, एकता नगर,वाकीता.खेड जि.पुणे<br>२)सचिन गायकवाड पुर्णनाव पता माहीत नाही<br>**आरोपी क्र १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीने त्यांची वापरती हिरो कंपनीची स्पेल्डर मोटार सायकलनं.एम एच १४ जे बी ८३३६ ही फिर्यादीने त्यांचे रुमचे समोर लॉककरुन पार्क केली असताना २३.४५ वा.सुमारास फिर्यादीचे शेजारी रहाणारे सुनिल मधुकर चव्हाण यांना पेट्रालचा वास आल्याने त्यानी रुमचे बाहेर जावून पाहीले असता फिर्यादीचे मोटर सायकलच्या पेट्रोल लॉक तुटलेला दिसला व त्यातून पेट्रोल खाली पडत असताना दिसले. त्यांनी पेट्रोलच्या वॉलवर हात लावून बंद करुन फिर्यादीचे रुमची बाहेरुन लावलेली कडी उघडून जोरात आवाज दिल्याने फिर्यादीने |

घराबाहेर पाहीले असता.त्यांनी सांगितले की, पेटोल लॉक तोडणारा व आपल्या खोल्यांना बाहेरुन कडया लावणारा इसम हा संडास मध्ये जावून लपलेला आहे.तेव्हा फिर्यादी व सोबत बो-हाडे,गणेश शेगाळ, जरे भाऊराव यांनी संडासमध्ये जावून पाहीले असता आरोपी क्र १ हा मिळुन आला व आरोपी क्र २ हा पळुन गेले आहे असे आरोपी क्र १ याने पोस्टे येथे संगितले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना बिराजदार ९४२२८४३४४८

०३

पोस्टे व गु रजि.नं. :- रावेत३१४/२०२३ भा.द.वि कलम २७९,३०४(अ) सह मो.वा.का.कलम १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६/०८/२०२३ रोजी ०१.३० वा ०२.०० वा.चे दरम्यान पुणे-मुंबई बँगलोर हायवे रोडवर, ग्राम दैवत श्री धर्मनाथ महाराज उडडाण पुलावर, रावेत येथे रोडचे मध्यभागी डिव्हायडरलगत.

गुन्हा दाखल :- दि.१६/०८/२०२३ रोजी ०९.३० वा.

फिर्यादी :- अजित मोहन बेंडभर,वय ३२, वर्षे, पोशि/३०९२,नेमणुक रावेत पो.स्टे.पिं.चि. शहर पुणे

आरोपी :- गणपती शिवाजी पाटील,सध्याचा पत्ता अमर हिंद मित्र मंडळ, जनता बॅकचेवर, तळेगांव दाभाडे स्टेशन
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिरस्ता एक अनोळखी इसम नांव व पत्ता माहिती नाही अंदाजे वय ३५ ते ४० यास पांढ-या रंगाची मारुती सुझुकी नेक्सा कंपनीची एक्स.एल.६ गाडी क्रमांक एम एच १३ वी एल ७१२० हीचे चालकाने आपले ताब्यांतील कार भरघाव वेगाने व रोडच्या रहदारीकडे दुलर्क्ष करुन निष्काळजीपणाने चालवुन रोडचे उजवे बाजुने कंटेनरला ओव्हरटेक करुन पुढे जात असतांना एका अज्ञात पादचा-यास पाठीमागुन जोराचा धक्का लागल्याने तो गंभीर जखमी होवुन बेशुध्द झाल्याने औषधोपचारकामी वाय.सी.एम.हॉस्पीटल पिंपरी पुणे येथे वॉर्ड क्रं. ५० मध्ये नेले असतांना ०३.३६ वाजता डॉक्टर तपासणी पुर्वी मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषीत केले आहे. सदरचे घटनेस वर नमुद कारचालक हा कारणीभुत झाला म्हणुन सरकारतर्फे फिर्याद दिलेवरुन गुन्हा दाखल.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पन्हाळे ९४२१९०७६०५

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड७९७/२०२३ भा.दं.वि कलम ४०६,४२० सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनां मधील) हितसंबंधांचे संरक्षण कायदा १९९९ चे कलम ३

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३.०३.२०२० ते दि.१५.०४.२०२ १ रोजी दरम्यान कार्यालय पत्ता ३०२, बी बिल्डींग, जी.ओ.स्क्वेअर, वाकड, पुणे

गुन्हा दाखल :- दि.१६/०८/२०२३ रोजी २३.१४ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- राहुल गुलाबसिंग जाखड, व्यवसाय जे.बी.सी.कॅपीटल प्रा.ली.चे डायरेक्टर, रा.सावली रेसिडेन्सी ,फ्लॅट नं.एस/३ ,म्हस्करनेस कॉलनी, पार्ट २ तळेगाव दाभाडे, जि.पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने फिर्यादीला त्याचे जे.बी.सी. कॅपीटल प्रा.ली. व जे.बी.सी. अॅग्रोटेक प्रा.ली. या कंपनीत गुंतवणुकीचे व परताव्याचे आमिष दाखवून फिर्यादीकडुन एकुण रक्कम ५०,००,०००/- रुपये रक्कम चेक व्दारे घेवून त्याबदल्यात परतावा म्हणुन एकुण २,००,००,०००/- रुपये परतावा देतो असे करारनामा करुन त्याआधारे आमिष दाखवून ते परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि ठाकुर ९७०२६५११००

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ८५७/२०२३भा.दं.वि कलम ४२० माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क), ६६(ड)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०७/२०२३ रोजी २१/१५ वा ते दि.११/०७/२० २३ रोजी १२/३० वा सुमा.२०९ /१४१६ संत तुकारामनगर पिंपरी पुणे १८ येथे फिर्यादीचे राहते घरी

गुन्हा दाखल :- दि.१६/०८/२०२३ रोजी २०.५६ वा

फिर्यादी :- प्रविण सिंग पनवार वय. ३५ वर्षे, धंदा. नोकरी ,रा. २०९/१४१६ संत तुकारामनगर पिंपरी पुणे

आरोपी :- मोबाईल नंबर ९१२४२१८९७६ धारक व मोबाईल नंबर ९३९४६८२३०७ धारक अनोळखी इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी नो ब्रोकरेज साईडवर फ्लॅट भाडयाने देणे असले बाबत जाहीरात दिली असता यातील मोबाईल नंबर ९१२४२१८९७६ धारक व मोबाईल नंबर ९३९४६८२३०७ धारक अनोळखी इसमांनी फ्लॅट भाडयाने घेणे असल्याचे सांगुन फिर्यादी यांना सरकारी कामास असल्याचे सांगुन सरकारी प्रोसेस म्हणुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन ९,०७,२४९/- रुपये पाठविण्यास सांगुन फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि गुन्हे देवडे साो ९२८४५५१२००

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ४२७/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०,४०६, ३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ऑक्टोबर २०२१ पासुन ते एप्रिल २०२२ रोजी दरम्यान येथील फिर्यादी यांचे राहतेचे घराजवळ.

गुन्हा दाखल :- दि.१६/०८/२०२३ रोजी १५/०४ वा.

फिर्यादी :- दिपक भानुदास घोरपडे, वय- ४८ वर्षे, धंदा- नोकरी, रा. फ्लॅट नं. डी/६०४, गणेशम फेज-२, गोविंद गार्डन चौकाजवळ, पिंपळे सौदागर, पुणे.

आरोपी :- १)मुकेश कुमार त्यागी रा. मेरठ, उत्तरप्रदेश २)मोहम्मद फैजान खान रा. दुबई ३)महिला आरोपी
४)सचिन रामचंद्र सुर्यवंशी, रा. हेळगाव, सातारा. ५)संतोष राजाराम पवार रा.मुंबई ६)अनिल काशीराम जाधव, रा.मुंबई.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी Vedicayurcure Health And Retails Pvt Ltd. ,AXIS E-CORP SOLUTIONS PRIVATE LIMITED व AYURCURE DIRECT PVT. LTD. या कंपनीचे डायरेक्टर आरोपी क्र १ ते ६ यांनी सुपरमार्केट व मिनीसुपर मार्केट टाकण्यासाठी अनुक्रमे २५ लाख व ११ लाख रुपयांचे प्लॅन सांगुन सदर प्लॅन मध्ये ऑनलाईन नेटबॅकींगने गुंतवणुक करण्यास भाग पाडुन अनुक्रमे ३५ महिने प्रति महिना १ लाख रुपये व ३० महिने ६० हजार रुपये तसेच विक्रीचे ५ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवुन एकुण ३६ लाख रुपये गुंतवणुक करण्यास सर्वांनी संगणमताने भाग पाडुन आजतागायत गुंतवणुक केलेली ३६ लाख रुपये व त्यावरील परतावा न देता आर्थीक फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि (गुन्हे) तांबे साो ९८२३०७९८५२

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ४२८/२०२३भा.दं.वि कलम४२०,४०६,४६७,४६८, १२०(ब),३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- माहे ऑक्टोबर सन २०१६ ते आज पावेतो मौजे पिंपळे गुरव येथील स. नं. ७२, हिस्सा नं. १ ब/४९, या मिळकती वरील गोविंद मार्केट मध्ये.

गुन्हा दाखल :- दि.१६/०८/२०२३ रोजी १९.३७ वा

फिर्यादी :- सुरेश डोंगरसिंग नाईक, वय ४३ वर्षे, धंदा डॉक्टर, रा. फ्लॅट नं. १०५, आशा शंकर प्लाझा हौसिंग सोसायटी, ए विंग, विदया नगर, नवी सांगवी, पुणे.

| | | |
|---|---|---|
| आरोपी | :- | १. किरण शंकर गारवे, २.किशोर शंकर गारवे दोघेही रा. पिंपळे गुरव, पुणे. ३.यशवंत माधवराव बारहाते रा. रो हाऊस नं. ०७, भामा नगर, साई सिटी, येवला रोड, कोपरगाव, जि. अहमदनगर, ४. महिला आरोपी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी मौजे पिंपळे गुरव येथील स. नं. ७२, हिस्सा नं. १ ब/४९, या मिळकतीवर कोणताही बांधकाम परवाना नसताना मौजे सांगवी स. नं. ७८/१ क या जागेचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी कडील बनावट शिक्क्यांचा वापर करुन बांधकाम चालु करणेकरीताचा बनावट दाखला तयार करुन तेथे व्यावसायिक इमारत बांधली तसेच पहिल्या मजल्यावर दुकान क्र. ०१ ते ०३ (एकुण क्षेत्रफळ ६३८ चौ. फुट) हे एकत्र करुन तो फ्लॅट क्र. ०१ असल्याचे व त्याचे एकुण क्षेत्रफळ ८५० चौ. फुट असे असल्याचे कागदोपत्री तयार करुन तो फ्लॅट आरोपी क्र ३ यास सन २००५ मध्ये विकला. आरोपी क्र १ व आरोपी क्र ३ यांचा व्यवहार पुर्ण झाला नसताना तसेच नमुद फ्लॅट हा फ्लॅट नसुन दुकान क्र. ०१ ते ०३ असे असल्याचे लक्षात आल्याने बारहाते याने नमुद दुकान क्र. ०१ ते ०३ हे सन २०१६ मध्ये विकुन माझ्याकडुन २७,५०,०००/- रु. टप्प्या-टप्प्याने चेकद्वारे व आर. टि. जी. एस. द्वारे घेवुन माझी फसवणुक केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गवारी ८३२९०४०५७४ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ४४६/२०२३ भा.द.वि.कलम ४१९,४२०,३४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कायदा कलम ६६C,६६D |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०७/२०२३ रोजी ११/०० वा. ते दि.१८/०७/२० २३ रोजी १५/३० वा. चे दरम्यान, तळेगाव दाभाडे ता. मावळ, जि.पुणे, |
| गुन्हा दाखल | :- | दि १६/०८/२०२३ रोजी १३.५२ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | महिला आरोपी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे फेसबुक अकाउंटवर लिंक येवुन मेसेज आला की " आपण या वर्क फ्रॉम होम करण्यास इच्छुक आहात काय " फिर्यादी यांना कामाची आवश्यकता असल्याने त्यांनी त्या लिंकवर रजिस्ट्रेशन केले. त्यानंतर आरोपीच्या नावाचे टेलीग्रामवर रजिस्टर असलेल्या आय.डी. वरुन फिर्यादी यांना अजुन एक लिंक आली व आरोपीने काम करण्यासाठी एक टास्क दिले त्या एका टास्क मधे सहा काम होते. त्याप्रमाणे आरोपी महीलेने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन तिने सांगीतले वरुन फिर्यादी हे टास्क पुर्ण करत गेले व त्यांना वेळो- वेळी पैसै पाठवत गेले असे फिर्यादी यांचे अकाऊंन्टवरुन एकूण ३,९८,२५०/- रुपयाची आर्थीक फसवणूक करण्यात आली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि वारे ९९२१६१७१४५ |